# राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १२/०९/२०२२ अखेरचा खरीप हंगाम २०२२-२३ चा साप्ताहिक अहवाल.

❖ **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, अमरावती व नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. तर औरंगाबाद व लातूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

❖ **खरीप हंगाम २०२२-२३ :**

❖ **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४२.८८ लाख हेक्टर असून दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर १४२.६६ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५३.८८ लाख हेक्टर असून १४६.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.१३.०९.२०२१ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १४५.११ लाख हे. (सरासरीशी ९४%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १४२.५९ लाख हे. (सरासरीशी १००%) होते.

- भात व नाचणी पिके वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
- मूग, उडीद पिके शेंगा लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीची कामे सुरु झाली आहेत.
- सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक पाते लागणे, फुलोरा ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक तुरे लागणे ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक पोटरी, फुलोरा, कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- भुईमूग पिक आऱ्या सुटणे ते शेंगा लागणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान व जमीन खरवडून जाण्याचे प्रकार झाले आहेत.

**पर्जन्यमान (२०२२)**

दि.१ जून ते १२ सप्टेंबर, २०२२ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ८९६.४ मि.मी. असून दि.१२ सप्टेंबर, २०२२ पर्यंत १०२७.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११४.७ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१२.०९.२०२१ अखेर १०१८.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११३.६ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ० | --- |
| ४ | ७५ ते १०० % | ८ | ठाणे, रायगड, रत्नागिरी, नंदुरबार, जळगांव, कोल्हापूर, परभणी, अकोला. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २६ | पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली. |

राज्यात दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ६ तालूक्यात ५० ते ७५ %, ७२ तालूक्यात ७५ ते १००% तर २७७ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **नैसर्गिक आपत्ती :**

दि.१२ सप्टेंबर, २०२२ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे सप्टेंबर-२०२२ मध्ये ७ जिल्हयात ४४,३१६ हे. पिकांचे क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत झाले आहे. तर बुलडाणा जिल्हयात ५९ हेक्टर क्षेत्र गोगलगाय मुळे बाधीत झाले आहे. बाधीत क्षेत्रामध्ये शेतीपिके, फळपिके व भाजीपाला पिकांचा समावेश आहे.


❖ **किड व रोग :**

राज्यात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा, गादमाशीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, ऊस पिकावर हुमणी, लोकरी मावा तसेच सोयाबीन पिकावर तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा, खोडमाशीचा, उंट अळी, चक्रीभुंगा या किडींचा व येलो मोझॅक या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.


किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटकनाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

**खरीप हंगाम सन-२०२२-२३ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी**

(दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर)



## खरीप हंगाम सन-२०२२-२३ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर)




## विभाग निहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१७ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर ४.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**
  - भात पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहेत.
  - नाचणी पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत.
  - तीळ, कारळे पिके वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहेत.
  - मूग, उडीद पिके शेंगा लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत.

- **किड व रोग : निरंक.**

## नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.०१ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर २०.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - नागली पिक फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
  - ज्वारी पिक कणसे लागणे ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - बाजरी पिक फुलोरा ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
  - मका पिक कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
  - तूर पिक शाखीय वाढ ते फुले लागणेच्या अवस्थेत आहे.
  - मूग, उडीद पिके शेंगा पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहेत.
  - सुर्यफुल पिक फुलकळीच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
  - भुईमूग पिक आऱ्या सुटणे ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
  - कापूस पिक फुले ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
  - आडसाली ऊस वाढीच्या अवस्थेत आहे.
- **किड व रोग :**
  - विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, तुडतुडे किडींचा, मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी या किडींचा प्रादुर्भाव आढळून आला.

## पुणे विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर ११.७१ लाख हेक्टर क्षेत्रावर (११०%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - मका पिक फुलोरा ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
  - बाजरी पिक कणसांमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.
  - मूग, उडीद पिके पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत.
  - तूर पिक फुलोरा ते कळया लागणेच्या अवस्थेत आहे.
  - कापूस पिक बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन पिक शेंगामध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
  - भुईमूग पिक शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीच्या अवस्थेत आहे.
  - चालु सप्ताहात काही ठिकाणी अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे.
- **किड व रोग :**
  - विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मूग व उडीद पिकांवर येलो मोझॅक या रोगाचा, सोयाबीन पिकावर तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आढळून आला.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.६४ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर ७.३५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

➢ भात व नाचणी पिके फुटवे फुटणे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
➢ मका पिक तुरा बाहेर पडणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
➢ तूर पिक वाढीच्या ते फांद्या फुटणेच्या अवस्थेत आहे.
➢ ज्वारी पिक पोटरीच्या अवस्थेत आहे.
➢ बाजरी पिक फुलोरा ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
➢ मूग, उडीद पिके शेंगा पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.
➢ भुईमूग पिक फुलोरा, आऱ्या सुटणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे.
➢ सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे.
➢ चालु हंगामातील आडसाली ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे.

- **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर खोडकिडीचा व करपा रोगाचा, ऊस पिकावर हुमणी, लोकरी मावा या किडींचा, सोयाबीन पिकावर तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा व येलो मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला.

## औरंगाबाद विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर २०.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

➢ कापूस पिक पाते, फुले ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
➢ मका पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
➢ सोयाबीन पिक फुलोरा, शेंगा लागणे, शेंगामध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे.
➢ मूग, उडीद पिके पक्वतेच्या अवस्थेत, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु झाली आहेत.
➢ तूर पिक वाढीच्या ते फांद्या फुटणेच्या अवस्थेत आहे.
➢ बाजरी पिक पोटरी ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत.
➢ भुईमूग पिक फुलोरा ते शेंगामध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.

- **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा, मका पिकावर लष्करी अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा व बोंड सड या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## लातूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर २७.७८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

- ज्वारी पिक पोटरीच्या ते वाढीच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके शेंगा धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.
- सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक पाते ते फुलोरा अवस्थेत आहे.

- **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, तुडतुडे किडींचा, ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, ऊस पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, चक्रीभुंगा, तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळी या किडींचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.७२ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर ३१.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

- मका पिक तुरे बाहेर पडणे ते दाणे लागणेच्या अवस्थेत आहे.
- ज्वारी पिक कणसे निसवणेच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत.
- भुईमूग पिक शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक शेंगामध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक फुलोरा ते पाते लागणेच्या अवस्थेत आहे.
- ऑगस्टमध्ये झालेल्या वादळी वारे, पाऊस यामुळे शेतपिकांचे नुकसान झाले आहे.

- **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, खोडमाशीचा, तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा व येलो मोझॅक या रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, शंखी गोगलगाय, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१३ लाख हेक्टर असून, दि.१२ सप्टेंबर, २०२२ अखेर १९.५० लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**

- भात पिक पोटरीच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिक पाते, फुलोरा ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे.
- ऑगस्टमध्ये काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले आहे.

- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिडीचा, गादमाशीचा, सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, उंट अळी, पांढरी माशी, खोडमाशी या किडींचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम २०२२-२३ मधील मुख्य पिकाखालील दि.१२/०९/२०२२ अखेरचा पिक पेरणी अहवाल**

**(क्षेत्र हेक्टर मध्ये)**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागिल वर्षाची पेरणी दि.१३.०९.२०२१ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १५१८४३९ | १५४५१२४ | १५४७८७८ | १०२ | १०० |
| २ | खरीप ज्वारी | ३१६५५१ | २०९७३७ | १४२६७५ | ४५ | ६८ |
| ३ | बाजरी | ६७५१०५ | ५०४०६३ | ४०५३८५ | ६० | ८० |
| ४ | रागी | ७५३१६ | ७३३६९ | ६८०८७ | ९० | ९३ |
| ५ | मका | ८८८५६९ | ८७०५४० | ८७७८४९ | ९९ | १०१ |
| ६ | इतर तृणधान्य (राजगिरा, कोडू/कोद्रा, कुटकी, वरई, बार्टी, सावा, राळा, इतर) | ४३५६१ | ४७५०६ | ३८०५१ | ८७ | ८० |
| **खरीप तृणधान्य** | | **३५१७५४२** | **३२५०३३८** | **३०७९९२४** | **८८** | **९५** |
| ७ | तूर | १२९९९०५ | १३२४३४३ | ११६९४५१ | ९० | ८८ |
| ८ | मुग | ४०४९२३ | ३७५५१५ | २७०९३५ | ६७ | ७२ |
| ९ | उडीद | ३७९४२३ | ४५०५४७ | ३५२७२८ | ९३ | ७८ |
| १० | इतर कडधान्य (कुळीथ, चवळी, मटकी, राजमा, इतर) | ८२८११ | ८२०३७ | ७९७४७ | ९६ | ९७ |
| **एकूण कडधान्य** | | **२१६७०६२** | **२२३२४४२** | **१८७२८६१** | **८६** | **८४** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५६८४६०३** | **५४८२७८०** | **४९५२७८६** | **८७** | **९०** |
| ११ | भुईमुग | १९७३४० | २०२६३८ | १५९४०९ | ८१ | ७९ |
| १२ | तीळ | १५८८६ | ७५२४ | ५६६१ | ३६ | ७५ |
| १३ | कारळ | १२४६३ | ६०४४ | ५३०६ | ४३ | ८८ |
| १४ | सुर्यफुल | १३८३० | १२३०८ | १५८६३ | ११५ | १२९ |
| १५ | सोयाबीन | ४१४३३८२ | ४६००९२५ | ४८९६२०० | ११८ | १०६ |
| १६ | इतर गळीतधान्य (एरंडी, इतर) | ९६२१ | ५६९९ | ३४६४ | ३६ | ६१ |
| **एकूण तेलबिया** | | **४३९२५२२** | **४८३५१३८** | **५०८५९०३** | **११६** | **१०५** |
| **१७** | **कापूस** | **४२११२९३** | **३९४१४६४** | **४२२७०८३** | **१००** | **१०७** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊस वगळून)** | | **१४२८८४१८** | **१४२५९३८२** | **१४२६५७७१** | **१००** | **१००** |
| **१८** | **ऊस (लागवडीचा)** | **१०९९९९९** | **२५१३९३** | **३७६२२५** | **३४** | **१५०** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५३८८४१७** | **१४५१०७७५** | **१४६४१९९६** | **९५** | **१०१** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत